राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण धोरण.

**महाराष्ट्र शासन**
**क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः SD-१२०१६/२/२०२६/(ई-१७१८८९५)/क्रीयुसे-२,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक: ०५ ऑक्टोंबर, २०२६

वाचाः-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.०१ जुलै, २०१६
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२,दि.१८ ऑगस्ट, २०१६.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१७९५/प्र.क्र.२९७/क्रीयुसे-२, दि.१९ जानेवारी, २०१७.
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दि.२७ मार्च,२०१७.
५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२,दि.१५ नोव्हेंबर,२०१७ व दि.१६ नोव्हेंबर,२०१७
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.११ मार्च, २०१९
७. शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.२४ ऑक्टोंबर,२०१९
८. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: खेआक्ष-१७१९/प्र.क्र.९६/क्रीयुसे-२ दि.१२ मार्च,२०२१
९. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दि.३० जून ,२०२२
१०. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८(भाग-१)/ क्रीयुसे-२, दि.१८ ऑक्टोबर, २०२३
११. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक:खेआक्ष-१७१९/प्र.क्र.१७६/क्रीयुसे-२, दि.२० जून,२०२४
१२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: खेआक्ष-२७२५/प्र.क्र.३३/क्रीयुसे-२ दि.१५ मे, २०२५
१३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: खेआक्ष-२७२५/प्र.क्र.३६/क्रीयुसे-२ दि. २८ मे, २०२५
१४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: खेआक्ष-२७२५/प्र.क्र.९७/क्रीयुसे-२ दि.०१ जुलै, २०२५

१५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक, ई नस्ती क्र.१२१६३९७/SESD-३८०१५/५/२०२५/क्रीयुसे-२, दि.०५ सप्टेंबर, २०२५.
१६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: SD-१२०१६/५/२०२५(ई-१४६७२५७)/क्रीयुसे-२, दि.०८ जानेवारी,२०२६.
१७. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अध्यक्षतेखालील दि.३० एप्रिल,२०२६ रोजी आयोजित बैठक
१८. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे पत्र क्र खेआ/समिती/शिफारस/२०२६/का-१५/ प्रस्ताव, दि.०८ मे,२०२६.
१९. मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री,क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षेतेखालील बैठक दि.१३.०५.२०२६.
२०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अध्यक्षतेखालील दि.०५ जून,२०२६ रोजी आयोजित बैठक
२१. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे पत्र क्र खेआ/समिती/शिफारस/२०२६/का-१५/ १३०८, दि.१८ जून,२०२६.
२२. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे पत्र क्र खेआ/समिती/शिफारस/२०२६/का-१५/ १४७४, दि.२५ जून,२०२६.
२३. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील बैठक दि.१२.०८.२०२६
२४. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे पत्र क्र खेआ/समिती/शिफारस/२०२६/का-१५/ २५३७, दि.१४ ऑगस्ट, २०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याने क्रीडा क्षेत्रात जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेसाठी वेळोवेळी विविध कल्याणकारी योजनांची आखणी केली आहे. महाराष्ट्र शासनाने ३० एप्रिल २००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय, निमशासकीय आणि अन्य क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये खेळाडूंसाठी ५ टक्के समांतर आरक्षण लागू केले.

दिनांक ०१ जुलै २०१६ रोजी या आरक्षणासंदर्भात सर्वसमावेशक स्वरूपाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, ज्यामध्ये खेळाडूंसाठीच्या सवलती, पात्रता आणि कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली होती. तथापि, त्यानंतरच्या काळात क्रीडा संघटनांमधील बदल, तांत्रिक प्रगती, आणि पडताळणी प्रक्रियेत उद्भवलेल्या समस्या लक्षात घेऊन शासनाने १८ ऑगस्ट २०१६, १० ऑक्टोबर २०१७, ३० जून २०२२, २० जून २०२४, आणि अलीकडेच १५ मे २०२५, २८ मे २०२५ व ०१ जुलै २०२५ रोजी विविध शासन निर्णय आणि शुद्धीपत्रकांद्वारे मूळ धोरणात महत्वपूर्ण व खेळाडूभिमुख बदल केले आहेत.

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी नोकरीमध्ये ५% समांतर आरक्षण लागू करण्याबाबतचे धोरण संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले होते. त्यानंतरच्या काळात खेळांची व्याप्ती, क्रीडा संघटनांची संलग्नता आणि क्रीडा प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. विशेषतः बोगस प्रमाणपत्रांना आळा घालण्यासाठी "क्रीडा ई-प्रमाण" प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

याशिवाय केंद्र शासनाचे राष्ट्रीय क्रीडा विधेयक-२०२५ लागू झालेले असून, याद्वारे राष्ट्रीय क्रीडा मंडळ (NSB) देखील स्थापन झाले आहे, त्यामुळे राष्ट्रीय क्रीडा मंडळ (NSB) द्वारे मान्यताप्राप्त राष्ट्रीय संघटनाद्वारा आयोजित केलेल्या स्पर्धांचाच समावेश ५% खेळाडू आरक्षण धोरणात करणे आवश्यक ठरत आहे.

शासनाने दि.०९ जुलै,२०२४ रोजी थेट नियुक्तीचे धोरण निश्चित केले आहे, यामध्ये केवळ ऑलिम्पिक गेम्समधील खेळांचा समावेश केला आहे. तसेच मिशन लक्ष्यवेध ही योजना राज्यातील खेळाडू ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये पदक विजेते व्हावेत,या हेतूने कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता ऑलिम्पिक गेम्स मध्ये राज्यात पदक विजेते खेळाडू तयार करण्याकडे लक्ष केंद्रित करुन, त्यास आवश्यक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ५% खेळाडू आरक्षणाबाबतचे यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून एकत्रित सुधारित धोरण निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय :-**</u>

या शासन निर्णयाव्दारे राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षणाबाबतचे वरील वाचा येथील क्र. १ ते १६ व यापूर्वीचे सर्व शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रके, परिपत्रक, पत्र इ. अधिक्रमित करण्यात येत असून नोकरीत ५% आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या खेळाडूंसाठी पुढीलप्रमाणे सुधारित धोरण ठरविण्यात येत आहे:-

२. राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५%आरक्षण सुधारित धोरणातील तरतुदी :-

**१. आरक्षणाची व्याप्ती आणि लागू असलेली कार्यालये :-**

सदर ५% समांतर खेळाडू आरक्षण खालील सर्व संस्थांमधील गट-अ, ब, क आणि ड मधील सरळसेवेच्या पदांसाठी बंधनकारक राहील.

i. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये.

ii.जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व नागरी स्थानिक संस्था (महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदा).

iii. शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे व विद्यापीठे (कृषी विद्यापीठांसह).

iv. शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा व सहकारी संस्था (बँका,साखर कारखाने इ.).

v. याशिवाय सहायक अनुदान मिळणा-या शासन मान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या-ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/सहायक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था /मंडळे यांना त्यांच्या आस्थापनेवरील पदावर खेळाडूंसाठी ५% आरक्षण (समातंर आरक्षण) लागू करणे बंधनकारक राहील.

vi. वरील कार्यालयांमधील गट-अ, ब, क व ड संवर्गातील नामनिर्देशनाने भरण्यात येणा-या पदांपैकी ५% पदे विशेष कामगिरी बजावणा-या पुरुष व स्त्री खेळाडूंसाठी आरक्षित असावीत. खेळाडू आरक्षण हे समांतर/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे, त्यामुळे भरतीची जाहिरात देतांना खेळाडू आरक्षणाच्या राखीव पदांची संख्या प्रत्येक वर्गामध्ये निश्चित करावी.

२. खेळाडू आरक्षणांतर्गत पात्र खेळ व उपप्रकार :-

i. सदर योजनेकरिता ऑलिम्पिक (समर) गेम्स स्पर्धांमधील सन २००५ नंतर सलग तीन ऑलिम्पिक गेम्समध्ये समाविष्ट असलेले खेळ आणि स्थानिक खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता कबड्डी, खो-खो, बुद्धीबळ, मल्लखांब, व क्रीकेट हे देशी व लोकप्रिय खेळ ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.

ii. तथापि, पात्र खेळांची वरील अट ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक गेम्स, एशियन गेम्स, पॅरा एशियन गेम्स व कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांना लागू राहणार नाही.

iii. एखाद्या खेळाचा समावेश ऑलिम्पिक (समर) स्पर्धेत झाल्यास अशा खेळ सलग तिस-यांदा ऑलिम्पिक गेम्समध्ये समाविष्ट झाल्यानंतर व त्याची अधिकृत घोषणा झाल्यानंतर ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरविण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

३. खेळाडू आरक्षणांतर्गत पात्र वयोगट :-

I. ५% खेळाडू समांतर आरक्षणासाठी अ.क्र. ५ व ६ मध्ये नमूद अधिकृत संघटनांमार्फत आयोजित होणाऱ्या अ.क्र.२ मधील नमूद स्पर्धांसाठी वरिष्ठ, युवा/युथ व कनिष्ठ वयोगट पात्र राहतील.

II. कोणत्याही परिस्थितीत १७ वर्षांखालील वयोगटातील कोणत्याही स्पर्धा आरक्षणाकरीता ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

४. क्रीडा विषयक अर्हता व पात्रता निकष :-

खेळाडू समांतर आरक्षण लागू असलेले गट, गट निहाय पात्र खेळ/क्रीडा प्रकार व स्पर्धा आणि गट निहाय पात्रता निकष पुढील प्रमाणे राहतील.

| गट | गट निहाय पात्र स्पर्धा | पात्रता |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| गट-अ | (१) अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>i) ऑलिम्पिक गेम्स<br>ii) एशियन गेम्स<br>iii) वरिष्ठ गटाच्या जागतिक चॅम्पियनशीप /कप<br>iv) वरिष्ठ गटाच्या एशियन चॅम्पियनशीप /कप<br>v) कॉमनवेल्थ गेम्स<br>vi) वरिष्ठ गटाच्या कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप /कप<br>vii) ग्रँडमास्टर (बुध्दीबळ)<br>viii) टेनिस ग्रॅन्डस्लॅम स्पर्धा | १) ऑलिम्पिक व पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धेतील सहभागी खेळाडू.<br>अथवा<br>२) स्तंभ क्र.२ मध्ये नमूद उर्वरीत स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ग्रँडमास्टर किताब मिळविलेला खेळाडू.<br>३) स्तंभ क्र.२ मध्ये नमूद स्पर्धांमध्ये किमान ८ देशांचा सहभाग आवश्यक तथापि, ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक, एशियन, पॅरा एशियन, कॉमनवेल्थ गेम्स व ग्रँडमास्टर या स्पर्धांकरीता ८ देशांच्या सहभागाची अट लागू असणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | **(२) पॅरा स्पर्धा:-**<br>I) पॅरालिम्पिक गेम्स<br>II) पॅरा एशियन गेम्स<br>ऑलिम्पिक / एशियन / कॉमनवेल्थ गेम्स मध्ये त्या त्या वर्षी आयोजित झालेले सर्व क्रीडा प्रकार आरक्षणासाठी पात्र राहतील. | |
| **गट-ब (राजपत्रित)** | अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा युवा/कनिष्ठ गटातील:-<br>(१) युवा/कनिष्ठ गटातील जागतिक चॅम्पियनशीप/कप<br>(२) युवा/कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप/कप<br>(३) युवा/कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप/कप<br>(४)युथ ऑलिम्पिक/ एशियन/कॉमनवेल्थ गेम्स<br>(५) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित जागतिक तसेच आशियाई शालेय क्रीडा स्पर्धा (फक्त १९ वर्षाखालील गट मुले/मुली)<br>(६) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>(७) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दीबळ)<br>(८) पॅरा जागतिक /एशियन /कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप | १) गट-अ पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू.<br>अथवा<br>२) गट अ मधील नमूद वरिष्ठ गटातील एशियन/कॉमनवेल्थ गेम्स मध्ये सहभागी झालेला खेळाडू.<br>अथवा<br>३) स्तंभ क्र.२ मधील नमूद स्पर्धांसाठी महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताच्या संघाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान मिळविलेला खेळाडू<br><br>४) स्तंभ क्र.२ मधील नमूद स्पर्धांमध्ये किमान ८ देशांच्या राष्ट्रीय संघांचा सहभाग असणे आवश्यक आहे. |
| **गट-ब (अराजपत्रित)** | अधिकृत राष्ट्रीय स्पर्धा:-<br>(१) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (National Games)<br>२)राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा/राष्ट्रीय फेडरेशन कप स्पर्धा (अधिकृत एकविध खेळ संघटनेमार्फत आयोजित वरिष्ठ /युथ /कनिष्ठ क्रीडा स्पर्धा )<br>(३) पॅरा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (पॅरा ऑलिम्पिक कमिटी द्वारा आयोजित)<br>(४) राष्ट्रीय शालेय खेळ महासंघाव्दारा आयोजित, राष्ट्रीय शालेय | १) गट-अ व गट-ब (राजपत्रित) मधील पात्रता निकष पूर्ण करणारे खेळाडू.<br>अथवा<br>२) स्तंभ क्र.२ मधील नमूद स्पर्धांसाठी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान मिळविलेला खेळाडू .<br><br>३) स्तंभ क्र.२ मधील नमूद स्पर्धांमध्ये किमान ८ राज्यांच्या संघांचा सहभाग असणे आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| | (१९ वर्षाखालील वयोगटाची) क्रीडा स्पर्धा<br>(५) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा. | |
| **गट-क** | (१) खेलो इंडिया स्पर्धा (SAI द्वारे आयोजित)<br>(२) राज्य स्तर वरिष्ठ /युथ / कनिष्ठ क्रीडा स्पर्धा (अधिकृत एकविध खेळ संघटनेमार्फत आयोजित)<br>(३) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा (फक्त १९ वर्षाखालील गट मुले/मुली)<br>(४) राज्यस्तर आंतर विद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)/(क्रीडा महोत्सव) /पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा<br>(५) राज्यस्तर पॅरा ऑलिम्पिक व मान्यता प्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या राज्यस्तर पॅरा क्रीडा स्पर्धा. | १)गट-अ,गट-ब (राजपत्रित) व गट-ब (अराजपत्रित) मधील पात्रता निकष पूर्ण करणारे खेळाडू.<br>अथवा<br>२) स्तंभ क्र.२ येथील अ.क्र.१ या स्पर्धांसाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करुन प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळविलेला खेळाडू.<br>अथवा<br>३) स्तंभ क्र.२ येथील अ.क्र.१ वगळता उर्वरित स्पर्धांमधील **वैयक्तिक स्पर्धांसाठी** महाराष्ट्रातील विभाग/जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळविलेला खेळाडू.<br>४) स्तंभ क्र.२ येथील अ.क्र.१ वगळता उर्वरित स्पर्धांमधील **सांघिक स्पर्धांसाठी** -<br>केवळ प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक) संपादन करणारे खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.<br>५) सांघिक स्पर्धेतील गट-ब (अराजपत्रित) मध्ये नमूद राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत चौथा ते आठवा क्रमांक संपादन करणारे राज्याच्या संघातील खेळाडू गट-क पदाच्या आरक्षणासाठी पात्र राहतील.<br>६) राष्ट्रीय स्पर्धांमध्ये किमान ८ राज्यांच्या संघांचा सहभाग असणे आवश्यक.<br>७) राज्यस्तर स्पर्धांमध्ये किमान १८ जिल्ह्यांचा किंवा ३२ संघांचा किंवा ८ विभागांच्या संघांचा सहभाग असणे आवश्यक राहील. |
| गट-ड | (१) वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (National Games)/वरिष्ठ गटातील राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा/ (National Championship)<br>(२) वरिष्ठ गटातील पॅरा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (पॅरा ऑलिम्पिक कमिटी द्वारा आयोजित) | १) गट अ/ब/ब (अराज)/क या पदाकरीता विहित केलेली अर्हताप्राप्त खेळाडू.<br>अथवा<br>२) स्तंभ क्र.२ मध्ये नमूद स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करुन सहभागी झालेले खेळाडू.<br>३) सदर स्पर्धांमध्ये किमान ८ राज्यांच्या संघांचा सहभाग असणे आवश्यक. |

**व्याख्या : सांघिक खेळ (Team Sport)** म्हणजे असा खेळ, ज्यामध्ये वैयक्तिक कौशल्यांपेक्षा दोनपेक्षा अधिक खेळाडूंचा समूह (संघ) एकत्रितपणे, एकाच ध्येयासाठी आणि परस्पर समन्वयाने विरोधी संघाविरुद्ध खेळतो.

**५. क्रीडा स्पर्धा आयोजन करणारे अधिकृत प्राधिकरण :-**

१. एकविध खेळाच्या राज्य /राष्ट्रीय क्रीडा संघटना.

२. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा मंडळ. (Association of Indian University)

३. भारतीय खेळ प्राधिकरण.

४. भारतीय शालेय खेळ महासंघ.

५. क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

६. इंडियन पॅरालिंम्पिक कमिटी व त्यांनी मान्यता दिलेल्या राज्य / राष्ट्रीय संघटना.

७. राज्यातील विद्यापीठ क्रीडा मंडळ (क्रीडा महोत्सवासाठी)

**६. एकविध खेळांच्या राज्य,राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय क्रीडा संघटना व अधिकृत क्रीडा स्पर्धांविषयक निकष:-**

**(६.१) आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (International Competition)**

**(अ) आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (International Competition):-** आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा या आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीशी संलग्न असलेल्या संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेने अथवा या आंतरराष्ट्रीय संघटनेस संलग्न असलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेने संबंधित आंतरराष्ट्रीय संघटनेच्या मान्यतेने /परवानगीने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड राष्ट्रीय संघातून झालेली असावी.

**(ब) आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा (International School Games):-** आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा अथवा त्यांच्या मान्येतेने भारतीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा आयोजित होणाऱ्या जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा, आशियाई शालेय क्रीडा स्पर्धा.

**(क ) आंतरविद्यापीठ जागतिक क्रीडा स्पर्धा (World University Games)** :- आंतरराष्ट्रीय विद्यापीठ क्रीडा महासंघ (International University Sports Federation) द्वारा आयोजित होणाऱ्या आंतरविद्यापीठ जागतिक क्रीडा स्पर्धा.

**(६.२) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (National Games)/ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (National Championship) या-**

१.भारतीय ऑलिम्पिक असोशिएशन (IOA) शी संलग्नता/मान्यता असलेली तसेच आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटना यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

**अथवा**

२.राष्ट्रीय क्रीडा संघटनेस भारतीय ऑलिम्पिक असोशिएशन (IOA) ची संलग्नता/मान्यता नसल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) या समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा फेडरेशनशी संलग्नता/मान्यता असलेली राष्ट्रीय क्रीडा संघटना यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

**अथवा**

३.राष्ट्रीय क्रीडा संघटनेवर एकापेक्षा अधिक कार्यकारिणी/संघटना कार्यरत असल्यास अथवा झाल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने संलग्नता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेची कार्यरत असलेली कार्यकारिणी/संघटना अधिकृत समजली जाईल किंवा नियुक्त करण्यात आलेली समिती (Ad-hoc Committee) यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

**(६.२.१)** राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक-२०२५ (National Sports Governance Act-२०२५) मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय क्रीडा मंडळ (NSB) स्थापन झाल्यानंतर, वरील (६.२) मधील अ.क्र.१,२ व ३ या तरतुदी अधिक्रमित होऊन, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (IOC) संलग्नता दिलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनेने अथवा/आणि राष्ट्रीय क्रीडा मंडळ यांनी संलग्नता/मान्यता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा महासंघाने आयोजित केलेल्या असाव्यात, ही बाब समाविष्ट असेल.

**(६.३) राज्य अजिंक्यपद (State Championship) क्रीडा स्पर्धा या-**

१.भारतीय ऑलिम्पिक असोशिएशन (IOA) शी संलग्नता/मान्यता असलेली तसेच आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनशी संलग्न असलेली व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनशी (MOA) संलग्नता/मान्यता असलेल्या राज्यातील एकविध खेळ राज्य संघटनेद्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

**अथवा**

२.एकविध खेळ राज्य संघटनेस महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशन (MOA) ची संलग्नता/मान्यता नसल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने संलग्नता/मान्यता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेद्वारे राज्यातील संलग्नता प्राप्त एकविध खेळ राज्य संघटनांद्वारे आयोजित केलेल्या असाव्यात.

**अथवा**

३.राज्य क्रीडा संघटनेवर एकापेक्षा अधिक कार्यकारिणी/संघटना कार्यरत असल्यास अथवा झाल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने संलग्नता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेद्वारे राज्यात संलग्नता दिलेली त्या-त्या खेळाची कार्यकारिणी/संघटना किंवा नियुक्त समिती (Ad-hoc Committee) यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

**(६.३.१)** राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक-२०२५ (National Sports Governance Act-२०२५) मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय क्रीडा मंडळ (NSB) स्थापन झाल्यानंतर, वरील (६.३) मधील अ.क्र.१,२ व ३ या तरतुदी अधिक्रमित होऊन, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (IOC) संलग्नता दिलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनेने अथवा/आणि राष्ट्रीय क्रीडा मंडळ यांनी संलग्नता/मान्यता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा महासंघाद्वारे संलग्नता/मान्यता दिलेल्या राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात, ही बाब समाविष्ट असेल.

**(६.४) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा (National School Games):-** भारतीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा आयोजित होणाऱ्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा.

**(६.५) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा (All India Inter University Games):-** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा महासंघाद्वारा आयोजित होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा.

**(६.६) दिव्यांग खेळाडू :**

**(अ) आंतरराष्ट्रीय पॅरालिंम्पिक क्रीडा स्पर्धा (International Paralympics Championships):-** आंतरराष्ट्रीय पॅरालिंम्पिक क्रीडा स्पर्धा या आंतरराष्ट्रीय पॅरालिंम्पिक समितीने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा आंतरराष्ट्रीय पॅरालिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय पॅरालिंम्पिक संघटनेने अथवा या आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेस संलग्न असलेल्या राष्ट्रीय पॅरालिंम्पिक संघटनेने आंतरराष्ट्रीय संघटनेच्या मान्यतेने / परवानगीने आयोजित केलेल्या असाव्यात.

**(ब) राष्ट्रीय पॅरालिंम्पिक क्रीडा स्पर्धा (National Paralympics Championships):-** राष्ट्रीय पॅरालिंम्पिक क्रीडा स्पर्धा या पॅरालिंम्पिक कमिटी ऑफ इंडिया यांनी आयोजित केलेल्या असाव्यात अथवा पॅरालिंम्पिक कमिटी ऑफ इंडिया या समितीशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय पॅरालिंम्पिक संघटनेने अथवा या राष्ट्रीय पॅरालिंम्पिक संघटनेस संलग्न असलेल्या राज्य पॅरालिंम्पिक संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा अशा राष्ट्रीय पॅरालिंम्पिक संघटनेने प्राधिकृत केलेल्या आयोजकांमार्फत राष्ट्रीय पॅरालिंम्पिक संघटनेच्या मान्यतेने /परवानगीने आयोजित केलेल्या असाव्यात.

**(६.६.१)** राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक-२०२५ (National Sports Governance Act-२०२५) मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय क्रीडा मंडळ (NSB) स्थापन झाल्यानंतर, वरील (ब) मधील तरतुद अधिक्रमित होऊन, आंतरराष्ट्रीय पॅरालिम्पिक समितीने (IOC) संलग्नता दिलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनेने अथवा/आणि राष्ट्रीय क्रीडा मंडळ यांनी संलग्नता/मान्यता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा महासंघाद्वारे संलग्नता/मान्यता दिलेल्या राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात, ही बाब समाविष्ट असेल.

(६.७) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी. राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेतील सहभाग अधिकृत होण्यासाठी राष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडूची झालेली निवड ही राज्य अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधून अथवा राज्यस्तर निवड चाचणीमधून झालेली असणे आवश्यक आहे.

(६.८) आंतरराष्ट्रीय फेडरेशनने वैयक्तिक तसेच सांघिक क्रीडा स्पर्धेसंबंधी विहीत केलेल्या नियमावली, अटी व शर्तीनुसार स्पर्धांचे आयोजन केलेले असणे अनिवार्य राहील.

(६.९) आमंत्रित स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्य स्पर्धामध्ये आयोजित होणा-या स्पर्धाचा समावेश केला जाणार नाही, तसेच या स्पर्धेतील खेळाडूंना लाभ देण्यात येणार नाही.

(६.१०) ऑलिम्पिक,एशियन व कॉमनवेल्थ गेम्स, जागतिक क्रीडा स्पर्धा, जागतिक चॅम्पियनशीप व एशियन चॅम्पियनशीप या अधिकृत स्पर्धांमधील ज्या खेळांमध्ये तृतीय क्रमांक दोन संघांना विभागून देण्याची तरतुद असेल, त्याच खेळाच्या राष्ट्रीय व राज्यस्तर स्पर्धेत, विभागून दिलेल्या तृतीय क्रमांक धारक खेळाडू उमेदवारांना ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

**७. सर्वसाधारण अर्हता:**

(१) खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

(२) खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात यावी. तथापि सदर वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल, तसेच दिव्यांग प्रवर्गासाठी ती ४५ वर्ष राहील.

(३) सदरचे आरक्षणाकरिता सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित केलेली कार्यपध्दती व निकष व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही होईल.

(४) समांतर आरक्षण असल्यामुळे आरक्षणातील संवर्गामध्ये अदलाबदल अनुज्ञेय होणार नाही.

(५) सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय व निमशासकीय कार्यालये,महामंडळे व अनुदानित संस्था यांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून, त्याचे योग्य प्रकारे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.

**८. क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीची मार्गदर्शक कार्यपध्दती** :

(१) एका खेळाच्या एकाच वर्षी एकापेक्षा अधिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा(नॅशनल गेम्स)/ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा आयोजित होत असल्यास राज्य संघटनेच्या सूचनेनुसार त्यामधील मुख्य असलेली व दरवर्षी नियमितपणे आयोजित होणारी एकच राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा अधिकृत समजण्यात येईल.

(२) आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अनुक्रमे देशाचे/राज्याचे एकापेक्षा अधिक संघ सहभागी झाले असतील, तेव्हा त्यामधील एकाच संघातील क्रीडा कामगिरी ग्राहय धरण्यात येईल.

उदा- १. आंतराष्ट्रीय/ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राज्याचे भारत, भारत - अ, भारत - ब या नावाने तीन संघ सहभागी झाले असतील अशा परिस्थितीत भारत या नावाने सहभागी झालेला संघ अधिकृत समजण्यात येईल. उर्वरीत भारत - अ, भारत - ब या नावाने सहभाग असलेल्या संघांना खेळाडू आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय असणार नाही. (याच नुसार राज्य स्पर्धेसाठी.)

उदा- २. आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राज्याचे भारत-अ/महाराष्ट्र-अ, भारत- ब/महाराष्ट्र-ब या नावाने दोन संघ सहभागी झाले असतील अशा परिस्थितीत भारत-अ/ महाराष्ट्र-अ या नावाने सहभागी झालेला संघ अधिकृत समजण्यात येईल. उर्वरीत भारत-ब/महाराष्ट्र-ब या नावाने सहभाग असलेल्या संघांना/खेळाडूंना खेळाडू आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.(याच नुसार राज्य स्पर्धेसाठी.)

(३) एखाद्या राज्य क्रीडा संघटनेवर दोन कार्यकारिणी कार्यरत असतील किंवा एका खेळाच्या दोन संघटना कार्यरत असतील, त्यावेळी एका कार्यकारिणी/संघटनेस धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाने मान्यता दिलेली असेल व दुसऱ्या कार्यकारिणी/संघटनेस, संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेस संलग्न असलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेने मान्यता दिलेली असेल अशा वेळी खेळाडूंचे हित (राज्यस्तर स्पर्धेमधील प्रावीण्यानंतर संबंधित खेळाडूना अधिकृत राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्याची संधी प्राप्त होते हे खेळाडूंचे हित ) विचारात घेऊन राष्ट्रीय संघटनेची मान्यता असलेली संघटना/कार्यकारिणी अधिकृत आहे असे समजण्यात येईल.

**९. क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणीच्या अनुषंगाने विविध घटकांमार्फत करावयाची कार्यवाही.**

**(अ) भरती प्राधिकरणाने करावयाची कार्यवाही.**

**१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने/निवड मंडळाने/शासनाच्या विविध विभागांच्या निवड प्राधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही :-**

i. खेळाडू उमेदवाराचा, खेळाडू प्रवर्गातून प्राप्त झालेल्या अर्जासोबत क्रीडा ई-प्रमाण या ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण प्रणालीद्वारे निर्गमित प्रमाणपत्र जोडलेले असणे आवश्यक आहे. **(क्रीडा प्रमाणपत्राचा विहित नमुना परिशिष्ट-अ मध्ये जोडला आहे.)**

ii. क्रीडा ई-प्रमाण या प्रणालीद्वारे निर्गमित प्रमाणपत्र सादर केली नसल्यास परीक्षेच्या पहिल्या टप्प्यातच अर्ज नाकारण्यात यावेत.

iii. निवड प्राधिकाऱ्यांनी (महाराष्ट्र लोकसेवा आयोग), खेळाडू प्रवर्गातून नियुक्तीसाठी पात्र झालेल्या खेळाडूं उमेदवाराने आवेदन अर्जासोबत सादर केलेले क्रीडा ई- प्रमाणपत्रासह परीक्षेचा अंतिम निकाल संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळवावा.

**२) नियुक्ती प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाहीः-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग/निवड मंडळ/संबंधित निवड प्राधिकारी यांनी खेळाडू प्रवर्गातून शिफारस केलेल्या उमेदवारांची क्रीडा ई- प्रमाणपत्र, त्यावरील क्यू-आर कोड स्कॅन करुन क्रीडा ई-प्रमाण या ऑनलाईन प्रणालीवरुन पुन:पडताळणी करावी.

**१०."क्रीडा ई-प्रमाण" प्रणालीद्वारे प्रमाणपत्र पडताळणीची कार्य प्रणाली : -**

१०.१ **राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा संघटना आणि स्पर्धा आयोजकांची जबाबदारी:-**

(अ) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सर्व अधिकृत क्रीडा संघटनानी, स्पर्धा संपन्न झाल्यापासून ३० दिवसाच्या (Calendar Days) आत, स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूची यादी आणि गुणपत्रिका क्रीडा विभागाच्या विहित "क्रीडा ई-प्रमाण पोर्टल वर अपलोड करण्यासाठी सोबतच्या **परिशिष्ट- ब व क** नुसार सर्व कागदपत्रे व सत्यता प्रमाणपत्रासह आणि संबंधित स्पर्धेचा अतिम निकाल .xlxs या फाईलमध्ये सादर करणे बंधनकारक राहील.

(ब) सदर माहिती सादर करताना सबंधित संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्याने आपल्या डिजिटल स्वाक्षरीने (DSC) /हस्ताक्षराद्वारे ती प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(क) एकदा ही माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या (https://sports.maharashtra.gov.in/) पोर्टलवर अपलोड झाली की, प्रणालीमधील "स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट" (Smart Contract) द्वारे या माहितीचा "क्रिप्टोग्राफिक हॅश" (Cryptographic Hash) तयार होऊन तो ब्लॉकचेनवर कायमस्वरूपी (Immutable) जतन केला जाईल.

(ड) **दंडात्मक तरतूदः-** जर एखाद्या संघटनेने ३० दिवसांच्या विहित मुदतीत अभिलेख ब्लॉकचेनवर अपलोड करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर केले नाहीत, तर "स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट" द्वारे सदर संघटनेला स्वयंचलितरित्या (Automatically) "डिफॉल्टर" यादीत टाकले जाईल आणि जोपर्यंत अभिलेख अपलोड होत नाहीत, तोपर्यंत होणा-या खेळाडूच्या नुकसानीसाठी संघटना जबाबदार राहील.

**१०.२. खेळाडूने करावयाची कार्यवाही:-**

(अ) खेळाडूने क्रीडा स्पर्धामधील प्रावीण्य प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या (https://sports.maharashtra.gov.in/) "क्रीडा ई-प्रमाण" पोर्टलवर आपल्या आधार-संलग्न (Aadhaar-linked) आयडीद्वारे लॉग-इन करावे.

(ब) खेळाडूने आपल्या स्पर्धेचे तपशील भरून पडताळणीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करावा. खेळाडूने सादर केलेली माहिती आणि संघटनेने ब्लॉकचेनवर जतन केलेला "अभिलेख हॅश" (Record Hash) याची प्रणालीद्वारे स्वयंचलित पडताळणी (Automated Verification) होईल. यासाठी कोणत्याही विभागीय कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची किवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(क) खेळाडू उमेदवाराने भरतीपूर्वी वरील पडताळणीद्वारे सादर केलेले पडताळणी प्रमाणपत्र कुठल्याही तांत्रिक व प्रशासकीय कारणामुळे अवैध ठरले, अशा परिस्थितीत जर सदर उमेदवाराकडे त्याव्यतिरीक्त भरतीप्रक्रिये पूर्वीच्या (भरती अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वी) कालावधीतील अन्य प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे असतील तर उमेदवाराने अशी प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे क्रीडा ई-प्रमाण प्रणालीद्वारे पडताळणी करुन नियुक्ती प्राधिका-यांकडे सादर करावीत.

(ड) खेळाडूने अ/ब/क/ड गटातील संवर्गाकरीता आवश्यक असलेल्या क्रीडा अर्हतेनुसार संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास अर्ज करताना सदर क्रीडा ई-प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी. अर्जासोबत क्रीडा ई-प्रमाणपत्राची प्रत असल्याशिवाय खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

(इ) ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालक यांच्याकडून ऑफलाईन प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतली आहे, त्या खेळाडूंना त्यांचे ऑफलाईन प्रमाणपत्र क्रीडा ई-प्रमाण प्रणालीद्वारे ऑनलाईन पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे.

**१०.३. प्रमाणपत्राची पडताळणी :-**

(अ) "क्रीडा ई-प्रमाण" प्रणालीद्वारे स्वयंचलितरित्या पडताळले गेलेले प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार उपसंचालक (मुख्यालय), क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे यांना राहतील. यामुळे पडताळणी प्रक्रियेचे केंद्रीकरण होऊन एकसमानता येईल.

(ब) डिजिटल स्वाक्षरीः- सदर प्रमाणपत्रावर माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० (IT Act, २०००) च्या कलम ५ अन्वये वैध असलेली उपसंचालक (मुख्यालय), क्रीडा व युवक सेवा यांची डिजिटल स्वाक्षरी असेल.

(क) QR कोड पडताळणी:- प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय QR कोड (Quick Response Code) असेल. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) किवा इतर कोणत्याही नियुक्ती प्राधिकाऱ्याने हा कोड स्कॅन केल्यास, त्यांना ब्लॉकचेनवरील मूळ नोंदीशी पडताळणी करता येईल. हे डिजिटल प्रमाणपत्र QR कोड (Quick Response Code) मार्फत पडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकरणाची राहील.

**१०.४. पडताळणी अहवाल आणि कालमर्यादा:-**

(अ) ब्लॉकचेन आणि स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट तंत्रज्ञानामुळे, माहितीची जुळवणी झाल्यास, खेळाडूस त्याचा "डिजिटल पडताळणी अहवाल" अर्ज केल्यानंतर अभिलेख उपलब्ध असल्यास तत्काळ किंवा कमाल ७ दिवसाच्या आत ऑनलाईन उपलब्ध होईल.

(ब) महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच अन्य सर्व पदभरतीसाठी सदर कार्यपध्दती लागू राहील.

(क) सदर प्रक्रिया नियमानुसार ५% खेळाडू आरक्षणास पात्र ठरणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सर्व खेळाडू, संबंधित क्रीडा संघटना व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

**१०.५. अपिलीय तरतूद:-**

(अ) जर तांत्रिक कारणास्तव किंवा माहितीच्या तफावतीमुळे प्रमाणपत्र नामंजूर (Reject) झाल्यास, खेळाडूस ऑनलाईन अपील करण्याची सुविधा असेल. यासाठी कमाल ३० दिवसांची कालमर्यादा राहील.

(ब) प्रथम अपील सहसंचालक (क्रीडा) आणि द्वितीय अपील आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे ऑनलाईन सादर करता येईल.

(क) अपीलावरील निर्णय आणि सुनावणीचा तपशील देखील ब्लॉकचेनवर नोंदवला जाईल (On-chain recording), जेणेकरून भविष्यात यात कोणताही फेरफार करता येणार नाही.

(ड) अपील तरतुदींतर्गत प्रथम व द्वितीय अपीलीय प्राधिका-यांच्या निर्णयाच्या अनुषंगाने उपसंचालक (मुख्यालय) हे प्रमाणपत्राबाबत उचित कार्यवाही करतील.

**११. क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाच्या प्रकरणी क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीच्या वैधता तपासणी संदर्भात विविध समित्यांचे गठण व त्यांची कार्यकक्षा खालीलप्रमाणे :-**

उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (मुख्यालय) यांच्याकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी प्रकरणे सादर करणाऱ्या उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी,स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी, क्रीडा प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी खालील प्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा | अध्यक्ष |
| २ | उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा (मुख्यालय) | सदस्य |
| ३ | संबंधित खेळातील एक उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी/त्या-त्या खेळाचा क्रीडा मार्गदर्शक/क्रीडा प्रशिक्षक | सदस्य |
| ४ | संबंधित खेळातील अर्जून पुरस्कारार्थी/शिवछत्रपती पुरस्कारार्थी/ राष्ट्रीयस्तर विजेता खेळाडू | सदस्य |
| ५ | क्रीडा आरक्षण कार्यासन प्रमुख | सदस्य-सचिव |

**सदर समितीची अधिकार व जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील:-**

i. या समितीतील अ.क्र.३ व ४ येथील समिती सदस्य नियुक्त करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

ii. संबंधित खेळाडूला प्रमाणपत्र पडताळणीबाबत अहवाल देण्यासाठी, संबंधीत खेळाडूची/उमेदवाराची आवश्यकतेनुसार क्रीडा कौशल्य चाचणी,संबंधित खेळाची प्रात्यक्षिके घेण्याचा/क्रीडा विषयक संबंधित कागदपत्रे तपासण्याचा अधिकार उक्त समितीस असेल.

iii. समितीने क्रीडा कौशल्य चाचणी, संबंधित खेळाची प्रात्यक्षिके घेण्याचा/क्रीडा विषयक संबंधित कागदपत्रे तपासण्याच्या वेळी चित्रफित तयार करावी. सदर चित्रफीत अहवालासोबत जोडावी. उपसंचालक (मुख्यालय) यांनी सदर चित्रफीत अहवालासोबत उपलब्ध क्लाऊड स्टोरेजमध्ये योग्य नावाने जतन करावी. सदर अहवाल व चित्रफीत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना केंव्हाही पाहता येईल या पद्धतीने जतन करावी.

iv. उपरोक्त समितीसमोर सादर होणाऱ्या प्रकरणांमध्ये संबंधीत उमेदवारास प्रात्यक्षिके करण्यास व कौशल्य चाचणीस उमेदवारास दोन संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. खेळाडू दोन्ही संधीमध्ये समितीसमोर गैरहजर राहिल्यास खेळाडूचे प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अपात्र ठरवण्यात येईल.

v. निनावी तक्रारींची दखल घेण्यात येऊ नये, तथापि, अशा तक्रारींसोबत ठोस पुरावे आढळून आल्यास, त्याविरुद्ध आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या मान्यतेने कार्यवाही करण्यात येईल.

vi. तक्रार दाखल करणा-या व्यक्तीला त्यांच्या तक्रारी पुष्ट्यर्थ किमान पुरावे सादर करावे लागतील, असे पुरावे नसलेल्या अर्जाबाबत दोन वेळा १५-१५ दिवसांची मुदत देऊन पुरावे दाखल करण्याची परवानगी द्यावी, या मुदतीत पुरावे सादर न होणारा अर्ज आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या मान्यतेने निकाली काढण्यात यावा.

vii. सदर समितीने खेळाडूच्या क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीच्या पात्र/अपात्रते संदर्भात स्वयंस्पष्ट कारणे नमूद करुन समितीचा अहवाल व शिफारस आयुक्त क्रीडा व युवक सेवा यांच्या समोर सादर करावा, अहवालाच्या अनुषंगाने आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी यावर उचित निर्णय घ्यावा.

३. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर ५ टक्के खेळाडू आरक्षणाबाबतचे याअगोदरचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित होतील. तथापि, या अगोदरच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाकरीता पात्र होत असलेल्या खेळाडू उमेदवारांना देखील शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून **तीन महिन्यांच्या** कालावधीमध्ये त्यांच्या क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करून घेणे आवश्यक राहील. त्यानंतर अधिक्रमित शासन निर्णयातील कोणत्याही तरतूदीनुसार पात्र ठरणाऱ्या खेळाडू उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राची पडताळणी करून दिली जाणार नाही.

४. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालक यांच्याकडून ऑफलाईन प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतली आहे, त्या खेळाडूंना त्यांचे ऑफलाईन प्रमाणपत्र या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **तीन महिन्यांच्या** कालावधीमध्ये क्रीडा ई-प्रमाण या प्रणालीद्वारे ऑनलाईन पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे व अनुदानित संस्था यांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून, त्याचे योग्य प्रकारे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.

६. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. यातील तरतुदी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहतील.

७. सदर आरक्षण धोरणात कोणतेही बदल करावयाचे असल्यास, त्यास मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००५१३२०४२९६४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHITAL ANAND RAMTEKE
Date: 2026.10.05 13:26:08 +05'30'

**(शितल रामटेके)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव,
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव
४) मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री, क्रीडा व युव कल्याण यांचे सचिव
५) मा.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई,
८) अ.मु.स/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,

९) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व विभागीय आयुक्त, (महसूल)
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) आयुक्त, (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (पत्राने)
१७) लोकायुक्त, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई (पत्राने)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२१) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा.
२२) निवडनस्ती (क्रीयुसे-२).

Annexure – A परिशिष्ट–अ

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# Directorate of Sports and Youth Services, Maharashtra State


ShivChhatrapati Sports Complex,Mahalunge-Balewadi,Pune-411045

sports.maharashtra.gov.in desk15.dsys-mh@gov.in


## — *Krida E-Pramaan* —

### Certificate to a Meritorious Sports person for Employment under the Government of Maharashtra.

(GR No.SD-12016/5/2025(I-1467357)/KRIUSE-2,Dt.08.01.2026)

**No.** **Date:**

**Name of the sports person** ______________________

**Father/Spouse's Name** ______________________

**Date of Birth** ______________________

**Resident of District** ______________________

**Representing (District/Division/State/Country)** ______________________

**Name of Sport** ______________________

**Name of the Competition** ______________________

______________________

**Period of the Competition from** ______________________

**Period of the Competition to** ______________________

**Competition Held at** ______________________

**Competition Level (State/National/International)** ______________________

**Position Obtained** ______________________

**Certificate No.** ______________________

**Valid for employment to Group** ______________________

This Certificate is issued on the basis of records available in this office.

**Deputy Director,**
**Sports and Youth Services,**
**Maharashtra state,Pune.**

Disclaimer : This certificate is granted on the basis of records submitted by the concerned State Sports Association or event organizer. The Directorate of Sports and Youth Services (DSYS) reserves the right to revoke this certificate if any objections arise. The Sports Association is solely responsible for the authenticity of the record of the Competition. The certificate's validity for sports reservation purposes is subject to the rules and policies in effect at the time of recruitment.

**This is Software generated certificate and need not be verified again by DSYS office.**
**For verification, scan QR code.**

# परिशिष्ट-ब

## राष्ट्रीय स्पर्धा अभिलेख बाबत तपशिल

| अनु. क्र | बाब | तपशिल | पुष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | संघटनेचे संपूर्ण नाव | | |
| २ | संघटनेचे पत्ता | | |
| ३ | राज्य संघटनेचे अध्यक्ष दुरध्वनी क्रमांक | | |
| ४ | राज्य संघटनेचे सचिव दुरध्वनी क्रमांक | | |
| ५ | राज्य संघटनेचे अधिकृत मेल आयडी | | |
| ६ | राज्य संघटनेचे नोंदणी क्रमांक | | |
| ७ | राज्य संघटनेचे अधिकृत जुनियर व सिनिअर वयोगट | | |
| ८ | स्पर्धाचे नाव | | |
| ९ | स्पर्धेचे वयोगट | | |
| १० | स्पर्धेचा स्तर | | |
| ११ | स्पर्धेचा कालावधी | | |
| १२ | स्पर्धेचे ठिकाण | | |
| १३ | स्पर्धा बाब | वैयक्तीक /सांघिक | |
| १४ | ऑलिम्पिक/कॉमनवेल्थ /एशियन गेम्समध्ये सदर खेळाचा समावेश आहे काय? किवा मल्लखांब, खो-खो, कबड्डी व बुध्दीबळ या खेळा पैकी आहे काय? | -- | |
| १५ | असल्यास, कधीपासून व कोणकोणत्या वर्षी | | |
| १६ | आंतरराष्ट्रीय ऑलिंम्पिक समिती (IOC) ची आंतरराष्ट्रीय फेडरेशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| १७ | ऑलिंम्पिक कौन्सील एशिया (OCA ) ची आंतरराष्ट्रीय फेडरेशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| १८ | आंतरराष्ट्रीय फेडरेशनची इंडियन फेडरेशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| १९ | इंडियन फेडरेशनची राज्य संघटना/असोसिएशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| २० | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाकरीता (Ad-hoc Committee ) नियुक्त आहे का ? | | |
| २१ | स्पर्धा कालावधीत भारतीय ऑलिंम्पिक समितीशी (IOA) संलग्नता/मान्यता आहे का? असल्यास त्याबाबतचे पत्र | | |
| २२ | स्पर्धा कालावधीत राज्य संघटनेस महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची मान्यता/संलग्नता आहे का? असल्यास त्याबाबतचे पत्र | | |
| २३ | स्पर्धा कालावधीमध्ये राष्ट्रीय संघटनेस संलग्न असलेल्या राज्याची यादी | | |
| २४ | राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या राज्य संघटनेची यादी | | |
| २५ | संलग्न असलेल्या राज्य पैकी स्पर्धेत सहभागी झालेल्या जिल्हयाची टक्केवारी शासन निर्णयातील ६० टक्के सहभागाची अट पुर्ण करीत आहे काय? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | एकविध खेळ संघटने शिवाय अधिकृत स्पर्धेचे आयोजन अन्य संस्था/संघटना करीत असल्यास संघटनेतस मान्यता दिली आहे काय ? | | |
| २७ | स्पर्धेचे आयोजन करणा-या संस्था/संघटनेचे नांव व पत्ता ? | | |
| २८ | स्पर्धेचे परिपत्रक | | |
| २९ | स्पर्धेचे अभिलेखे अध्यक्ष/सचिव यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेली आहेत काय? | | |
| ३० | सहभागी सर्व जिल्ह्यांचे / राज्यांचे प्रवेशअर्ज | | |
| ३१ | राष्ट्रीय स्पर्धेची भाग्यपत्रिका | | |
| ३२ | राष्ट्रीय स्पर्धाचे गुणपत्रिका | | |
| ३३ | राष्ट्रीय स्पर्धाचे अंतीम निकालपत्रक | | |
| ३४ | राष्ट्रीय स्पर्धा प्रमाणपत्र वितरण नोंदवही | | |
| ३५ | स्पर्धास निरिक्षक उपस्थित होते काय ? | | |
| ३६ | सर्व कागदपत्र सचिवांच्या स्वाक्षरी व शिक्काने सादर केली आहेत काय ? | | |
| ३७ | स्पर्धामध्ये तृतीय क्रमांक विभागून दिल्या जातो काय ? | | |
| ३८ | असल्यास, ऑलिम्पिक, कॉमनवेल्थ, आशियाई, जागतिक क्रीडा स्पर्धा व आशियाई अजिंक्यपद स्पर्धामध्ये तृतीय क्रमांक देण्याची तरतुद आहे काय ? असल्यास पुरावा जोडावा | | |
| ३९ | आवश्यक वाटल्यास इतर माहिती जोडावी व सोबत तपशिल द्यावा | | |
| ४० | संघटनेच्या वतीने आयोजित वरिल नमुद स्पर्धाची .xlxs (excel ) फाईल ऑनलाईन ऑफलाईन स्वाक्षरीसह जोडावी. | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त माहितीच्या संदर्भात कोणत्याही तक्रारीचे निवारण करण्याची संपुर्ण जबाबदारी निम्रस्वाक्षरीतांची राहील. प्रमाणित करण्यात येते की उपरोक्त नमुद केल्यानुसार माहिती सत्य असून त्यामध्ये कोणत्याही तफावत नाही असल्यास सदर तफावत सप्रामान दुरूस्ती करून देण्याची जबाबदारी निम्रस्वाक्षरात्याची राहील उपरोक्त प्रमाणे या अर्जातील व अर्जाच्या सहपत्रातील पुरविण्यात माहिती चुकीची आढळल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत आढळल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी निम्र स्वाक्षरीतांची राहील तसेच अशा चुकीच्या माहितीमुळे होणा-या परिणामांची जाणीव मला आहे. वरिल प्रमाणे सर्व माहिती स्पर्धाच्या अनुषंगाने दिलेले आहे .

अध्यक्ष/ सचिव
(शिक्का/स्वाक्षरी )

# परिशिष्ट-क

राज्यस्तरीय स्पर्धा अभिलेख बाबत तपशिल

| अनु. क्र | बाब | तपशिल | पुष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | संघटनेचे संपूर्ण नाव | | |
| २ | संघटनेचे पत्ता | | |
| ३ | राज्य संघटनेचे अध्यक्ष दुरध्वनी क्रमांक | | |
| ४ | राज्य संघटनेचे सचिव दुरध्वनी क्रमांक | | |
| ५ | राज्य संघटनेचे अधिकृत मेल आयडी | | |
| ६ | राज्य संघटनेचे नोंदणी क्रमांक | | |
| ७ | राज्य संघटनेचे अधिकृत जुनियर व सिनिअर वयोगट | | |
| ८ | स्पर्धाचे नाव | | |
| ९ | स्पर्धेचे वयोगट | | |
| १० | स्पर्धेचा स्तर | | |
| ११ | स्पर्धेचा कालावधी | | |
| १२ | स्पर्धेचे ठिकाण | | |
| १३ | स्पर्धा बाब | वैयक्तीक /सांघिक | |
| १४ | ऑलिम्पिक/कॉमनवेल्थ /एशियन गेम्समध्ये सदर खेळाचा समावेश आहे काय? किवा मल्लखांब, खो-खो, कबड्डी व बुध्दीबळ या खेळा पैकी आहे काय? | -- | |
| १५ | असल्यास, कधीपासून व कोणकोणत्या वर्षी | | |
| १६ | आंतरराष्ट्रीय ऑलिंम्पिक समिती (IOC) ची आंतरराष्ट्रीय फेडरेशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| १७ | ऑलिंम्पिक कौन्सील एशिया (OCA) ची आंतरराष्ट्रीय फेडरेशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| १८ | आंतरराष्ट्रीय फेडरेशनची इंडियन फेडरेशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| १९ | इंडियन फेडरेशनची राज्य संघटना/असोसिएशनला संलग्नता /मान्यता आहे का ? त्याबाबतचे पत्र | | |
| २० | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाकरीता (Ad-hoc Committee ) नियुक्त आहे का ? | | |
| २१ | स्पर्धा कालावधीत भारतीय ऑलिंम्पिक समितीशी (IOA) संलग्नता/मान्यता आहे का? असल्यास त्याबाबतचे पत्र | | |
| २२ | स्पर्धा कालावधीत राज्य संघटनेस महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची मान्यता/संलग्नता आहे का? असल्यास त्याबाबतचे पत्र | | |
| २३ | स्पर्धा कालावधीमध्ये राज्य संघटनेस संलग्न असलेल्या जिल्हयाची यादी | | |
| २४ | राज्य स्पर्धेत सहभागी झालेल्या जिल्हा संघटनेची यादी | | |
| २५ | संलग्न असलेल्या जिल्हये पैकी स्पर्धेत सहभागी झालेल्या जिल्हयाची टक्केवारी शासन निर्णयातील ६० टक्के सहभागाची अट पुर्ण करीत आहे काय? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | एकविध खेळ संघटने शिवाय अधिकृत स्पर्धेचे आयोजन अन्य संस्था/संघटना करीत असल्यास संघटनेतस मान्यता दिली आहे काय ? | | |
| २७ | स्पर्धेचे आयोजन करणा-या संस्था/संघटनेचे नांव व पत्ता ? | | |
| २८ | स्पर्धेचे परिपत्रक | | |
| २९ | स्पर्धेचे अभिलेखे अध्यक्ष/सचिव यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेली आहेत काय? | | |
| ३० | सहभागी सर्व जिल्ह्यांचे प्रवेशअर्ज | | |
| ३१ | राज्य स्पर्धेची भाग्यपत्रिका | | |
| ३२ | राज्य स्पर्धाचे गुणपत्रिका | | |
| ३३ | राज्य स्पर्धाचे अंतीम निकालपत्रक | | |
| ३४ | राज्य स्पर्धाचे अंतीम निकालपत्रक स्पर्धा प्रमाणपत्र वितरण नोंदवही | | |
| ३५ | स्पर्धास निरिक्षक उपस्थित होते काय ? | | |
| ३६ | सर्व कागदपत्र सचिवांच्या स्वाक्षरी व शिक्काने सादर केली आहेत काय ? | | |
| ३७ | स्पर्धामध्ये तृतीय क्रमांक विभागून दिल्या जातो काय ? | | |
| ३८ | असल्यास, ऑलिम्पिक, कॉमनवेल्थ, आशियाई, जागतिक क्रीडा स्पर्धा व आशियाई अजिंक्यपद स्पर्धामध्ये तृतीय क्रमांक देण्याची तरतुद आहे काय ? असल्यास पुरावा जोडावा | | |
| ३९ | आवश्यक वाटल्यास इतर माहिती जोडावी व सोबत तपशिल द्यावा | | |
| ४० | संघटनेच्या वतीने आयोजित वरिल नमुद स्पर्धाची .xlxs (excel ) फाईल ऑनलाईन ऑफलाईन स्वाक्षरीसह जोडावी. | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त माहितीच्या संदर्भात कोणत्याही तक्रारीचे निवारण करण्याची संपुर्ण जबाबदारी निम्नस्वाक्षरीतांची राहील. प्रमाणित करण्यात येते की उपरोक्त नमुद केल्यानुसार माहिती सत्य असून त्यामध्ये कोणत्याही तफावत नाही असल्यास सदर तफावत सप्रामान दुरूस्ती करून देण्याची जबाबदारी निम्नस्वाक्षरात्याची राहील उपरोक्त प्रमाणे या अर्जातील व अर्जाच्या सहपत्रातील पुरविण्यात माहिती चुकीची आढळल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत आढळल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी निम्न स्वाक्षरीतांची राहील तसेच अशा चुकीच्या माहितीमुळे होणा-या परिणामांची जाणीव मला आहे. वरिल प्रमाणे सर्व माहिती स्पर्धाच्या अनुषंगाने दिलेले आहे.

अध्यक्ष/ सचिव

(शिक्का/स्वाक्षरी)